# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**व्यवस्थापन परिषदेच्या १९९ व्या (तातडीच्या) ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत**

**मंगळवार, दि. १० जून, २०२५ रोजी दुपारी १२: ३० वा.**

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १९९ वी (तातडीची) **ऑनलाईन बैठक मंगळवार, दि.१० जून, २०२५ रोजी दुपारी १२:३० वा.** मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली आहे.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | अनुपस्थित |
| १७) | डॉ. अशोक उबाळे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १९) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. अतुल तानाजी लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

स्वागत:

प्र. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रस्तुत विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलांतर्गत विविध विषयातील कंत्राटी सहायक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ नुसार गठीत करण्यात येणाऱ्या स्थानिक निवड समितीमध्ये कलम १०३ (२) (च) नुसार व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेल्या एक प्राचार्य किंवा प्राध्यापकाचे सदस्य म्हणून नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रस्तुत विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुलांमधील नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभारासाठी जाहिरातीनुसार एकूण १२९ तात्पुरती कंत्राटी सहायक प्राध्यापकांची पदे भरणेसाठी मा. कुलगरु महोदयांनी मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेनुसार संकुलांतर्गत विविध विषयातील कंत्राटी सहायक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ नुसार गठीत करण्यात आलेल्या स्थानिक निवड समितीमध्ये कलम १०३ (२) (च) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला प्राचार्य किंवा प्राध्यापक यांचे नामनिर्देशन होणे आवश्यक आहे.<br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रस्तुत विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलांतर्गत विविध विषयातील कंत्राटी सहायक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ नुसार गठीत करण्यात येणा-या स्थानिक निवड समितीमध्ये कलम १०३ (२) (च) नुसार व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेल्या एक प्राचार्य किंवा प्राध्यापकाचे सदस्य म्हणून नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग (शिक्षक) |
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रस्तुत विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलांतर्गत विविध विषयातील कंत्राटी सहायक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ नुसार गठीत करण्यात येणाऱ्या स्थानिक निवड समितीमध्ये कलम १०३ (२) (च) नुसार व्यवस्थापन परिषदेचे सदस्य असलेले डॉ.समाधान दिगंबर पवार यांचे सदस्य म्हणून सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **विद्यापीठ व महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी व त्याचे एक कमावते पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविण्यात आला असून सदर योजनेमध्ये विविध प्राधिकरणातील सदस्यांचा समावेश करण्याबाबत झालेल्या चर्चेनुसार अधिसभेने केलेली शिफारस फेरविचारार्थ.**<br>टिपणी: दि.२४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीतील विषय क्रमांक १६ अन्वये खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात आला होता.<br>विद्यापीठ व महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी व त्याचे एक कमावते पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविण्यात आला असून सदर योजनेमध्ये विविध प्राधिकरणातील सदस्यांचा समावेश करण्यात यावा, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.<br>ठराव: सदरचा प्रस्ताव श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. राजेंद्र शंकर सुर्यवंशी यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>वरील ठरावास अनुसरुन विद्यार्थी विकास विभागाकडून व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर केला असता सदर ठरावाच्या अनुषंगाने दि.२९/११/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.<br>विद्यापीठ व महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी व त्याचे एक कमावते पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविण्यात आला असून सदर योजनेमध्ये विविध प्राधिकरणातील सदस्यांचा समावेश करण्याबाबत दि.२४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीतील ठराव क्र.१६ अन्वये केलेली शिफारस ही अपघाती विमा नियमावलीमध्ये बसत नसल्याने सर्वानुमते अमान्य करण्यात आली.<br>उपरोक्त ठरावाबाबत दि.११/०३/२०२५ रोजीच्या बैठकीत ठरावावर चर्चा होवून सदरचा विषय नव्याने अपघात विमा नियमावली तयार करताना पुनश्च: व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवून आगामी निविदेमध्ये समावेश करण्यात यावा.<br>तरी उपरोक्त चर्चेनुसार विद्यापीठ व महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी व त्याचे कमावते पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या अपघाती विमा योजनेत विविध प्राधिकरणातील सदस्यांचा समावेश करण्याबाबत अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव: | **विद्यापीठ व महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी व त्याचे एक कमावते पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविण्यात आला असून सदर योजनेमध्ये विविध प्राधिकरणातील सदस्यांचा समावेश करण्याबाबत झालेल्या चर्चेनुसार अधिसभेने केलेली शिफारस सर्वानुमते अमान्य करण्यात आली. तसेच पूर्वीच्या पध्दतीने अपघाती विमा उतरविण्याचे ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **सन २०२५-२६ या वर्षात दक्षिण पश्चिम विभागीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यासाठीचा प्रस्ताव असोसिएशन ऑफ इंडीयन युनिव्हर्सीटी न्यू दिल्ली यांना देण्यास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चासाठी रुपये एक कोटी पन्नास लक्ष इतक्या खर्चाची तरतूद करण्याची बाब विचारार्थ.** | विद्यार्थी विकास विभाग |

टिपणी: असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी न्यू दिल्ली मार्फत विविध युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते त्यापैकीच एक म्हणजे साऊथ वेस्ट झोन युवा महोत्सव आहे सदर महोत्सवात कर्नाटक व महाराष्ट्र तसेच गोवा या राज्य समाविष्ट करण्यात आले आहेत. तीन राज्यांमधील एकूण ३० विद्यापीठे युवा महोत्सवात सहभागी होत असतात प्रत्येक विद्यापीठातून ६० विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच शिक्षक व इतर सहभागी होत असतात सहभागी विद्यार्थ्यांना रुपये ३५००/- इतकी नोंदणी फी घेऊन सहभाग दिल्या जातो तरी ३५००/- X १८०० विद्यार्थ्याचे एकूण अंदाजे ६० लक्ष रुपये जमा होतात. तरी पश्चिम विभागीय युवा महोत्सव आयोजित करण्यासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| १ | एकुण २५०० व्यक्तीचं भोजन व्यवस्था खर्च | ६०,००,००० |
| २ | एकुण २५०० व्यक्तीचे निवास व्यवस्था खर्च | १०,००,००० |
| ३ | परिक्षक निवास (हॉटेल) व्यवस्था खर्च | ५०,०००० |
| ४ | परिक्षक प्रवास खर्च एक दिवसाचा दैनिक भत्ता | ५०,०००० |
| ५ | स्मतिचिन्हे प्रमाणपत्र बॅनर छपाई निमत्रण पत्रीका तसेच महितीपत्रक व कीट | १,५०,०००० |
| ६ | साउंड सिस्टीम भाडे | ५०,०००० |
| ७ | सेलीब्रेटी मानधन | २०,०००० |
| ८ | विद्यापीठ ते स्टॅन्डपर्यंत सघं आणणे व सोडणे बस सेवा खर्च | १०,०००० |
| ९ | परिक्षक निवासापासून आणणे व सोडणे | १०,०००० |
| १० | दोन वॉटरप्रुफ स्टेज व मोठा मंडप | ४५,००,००० |
| | एकूण | १,५०,००००० |

सबब, सन २०२५-२६ या वर्षात दक्षिण पश्चिम विभागीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यासाठीचा प्रस्ताव असोसिएशन ऑफ इंडीयन युनिव्हर्सीटी न्यू दिल्ली यांना देण्यास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चासाठी रुपये एक कोटी पन्नास लक्ष इतक्या खर्चाची तरतूद करण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **राजभवन मुंबई येथे आयोजित कार्यक्रमासाठी लागणाऱ्या खर्चाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: दि.२० जून २०२४ रोजी राजभवन, मुंबई येथे मा राज्यपाल यांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्याबाबत श्री विकास कुलकर्णी under Secretary व डॉ केदारनाथ काळवणे यांची राजभवन येथे झालेल्या चर्चेनुसार पश्चीम बंगाल या राज्याचे दोन लोकनृत्य व लोकगीत व पश्चीमबंगाल या राज्याविषयीचा माहितीपट तयार करून त्याचे सादरीकरण करण्याबाबत सुचविण्यात आले होते. त्यास अनुसरून दि.१० ते १९ जून २०२४ या दरम्यान १० दिवसाच्या निवासी सराव शिबीराचे आयोजन करून ३५ व्यक्तींची दोन नृत्य व एक लोकगीत व माहितीपटाची तयारी चालू होती. परंतू शिक्षक आमदार निवडणूकीची आदर्श आचार सहिंता लागल्याने सदरचा कार्यक्रम रद्द करण्यात येत आसल्याबाबत श्री विकास कुलकर्णी under Secretary राजभवन, मुंबई यांनी कळविले होते. त्यानुसार सदरचा कार्यक्रम मा कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने दि.१३/०६/२०२४ रोजी रद्द करण्यात आला होता.<br>पुनश्च सन २०२५-२६ या वर्षात राजभवन यांच्याकडून कळविण्यात आलेल्या तारखेस मुंबई येथे मा राज्यपाल यांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्याबाबत राजभवन येथील श्री विकास कुलकर्णी under Secretary यांनी दूरध्वनीद्वारे डॉ. केदारनाथ काळवणे यांना सुचित केले आहे.<br>तरी श्री विकास कुलकर्णी under Secretary यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार पश्चीम बंगाल या राज्याचे दोन लोकनृत्य व लोकगीताचे सादरीकरण तसेच पश्चीमबंगाल या राज्याविषयीचा माहितीपट तयार करून त्याचे सादरीकरण करण्याबाबत सुचविण्यात आले आहे. तरी दोन नृत्यासाठी विद्यार्थी, वादक, लोकगीतासाठी विद्यार्थी, वादक, प्रशिक्षक, सहायक अशा एकुण ३५ व्यक्तीसह १० दिवसाच्या निवासी सराव शिबीराचे आयोजन करून दोन नृत्य व एक लोकगीत व माहितीपटाचे सादरीकरणाची तयारी करणे आवश्यक आहे तरी उपरोक्त तिन्ही बाबीसाठी खालीलप्रमाणे विविध खर्च अपेक्षित आहे. | विद्यार्थी विकास विभाग |

| अ क्र | खर्चाचा तपशिल | शिबिराचे एकुण दिवस | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| १ | लोकनृत्य प्रशिक्षण मानधन | निवासी सराव शिबिराचे १० दिवस व प्रत्यक्ष सादरीकरणाचा १ दिवस असे एकुण ११ दिवसासाठीचे दर व्यवस्थापन परिषदेच्या दि.३०/११/२०२४ रोजीच्या बैठकीत ठरलेले प्रति दिन प्रति वादक व प्रशिक्षकासाठी आहेत. | ९,९००/- |
| २ | लोकनृत्य प्रशिक्षण मानधन | | ९,९००/- |
| ३ | लोकनृत्य वादक | | ९,९००/- |
| ४ | लोकनृत्य वादक | | ९,९००/- |
| ५ | लोकगीत प्रशिक्षण मानधन | | ९,९००/- |
| ६ | लोकगीत वादक मानधन | | ९,९००/- |
| ७ | काव्यनृत्य प्रशिक्षण मानधन व संबधित इतर खर्च | | १०,०००/- |
| ८ | एकुण ३५ व्यक्तीच्या भोजनाचा खर्च प्रति विद्यार्थी एक वेळ नाष्टा दोन वेळ चहा तसेच अनलिमीटेड जेवणासाठी अंदाजे रू ३००/- प्रति विद्यार्थी प्रमाणे रू ३०० X ३५ विद्यार्थ्यांचे = १०५०/- प्रति दिन प्रमाणे १० दिवसाचे | | १,०५,०००/- |
| ९ | प्रति विद्यार्थी रू २०००/- प्रमाणे एकुण ३५ व्यक्तींचा सोलापूर मुंबई प्रवास खर्च | | ७०,०००/- |
| १० | प्रवासा दरम्यान इतर खर्चासाठी | चहापाण व नाष्टासाठी | ५,०००/- |
| ११ | माहितीपट तयार करणे | व्हीडीओ रेकार्डींग संगीत Editing करणे मानधन | २०,०००/- |
| | | एकुण | २,६९,४००/- |

सबब, राजभवन यांच्या सुचना व तारखेनुसार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यास व त्यासाठी एकुण रू २६९४००/- इतका खर्च होणार असून सदरच्या खर्चास व होणारा सर्व खर्च हा या विभागाच्या Youth Festival या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची टाकण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **राजभवन मुंबई येथे आयोजित कार्यक्रमासाठी लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०५ ] | **Quick Heal Foundation (QHF), पुणे व पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी सामंजस्य करारनाम्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: Quick Heal Foundation (QHF), पुणे व पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ पासून दरवर्षी सामंजस्य करार होत असतो. या करारानुसार QHF तर्फे खालील उपक्रम राबविण्यात आले.<br>१. Online Course on Cyber Security Awareness<br>२. Earn and Learn Scheme for Students<br>३. Faculty Development Programme<br>शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून Earn and Learn या उपक्रमांतर्गत संकुलातील १३८ विद्यार्थ्यांनी ६७१ शाळा व महाविद्यालयात १०३८ सेमिनारद्वारे २,२५,८४६ विद्यार्थ्यांना Cyber Security या विषयावर व्याख्यान दिले. या मोबदल्यात QHF कडून संकुलातील १३८ विद्यार्थ्यांना रु.१४,१०,७००/- इतके मानधन मिळाले. आजपर्यंत संगणकशास्त्र संकुलास Quick Heal Foundation कडून खालील राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.<br>१. Best Script Award for the Short Film "Cyber Space"<br>२. Best Process Compliance Award<br>३. Best Program Outreach and Impact Award<br>४. Creative Performance Award<br>५. Extra Mile Recognition Award<br>तसेच २०२४-२५ मध्ये Quick Heal Foundation आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन यांचे हस्ते संकुलास Best Cyber Club Overall व कु. सुप्रिया शिंदे या विद्यार्थिनीस Best PR Media Director पुरस्कार प्राप्त झाले.<br>शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी अशाच प्रकारचा सामंजस्य करार करण्याबाबत QHF कडून दि. ०१-०६-२०२५रोजी ईमेलद्वारे सामंजस्य कराराचा मसुदा प्राप्त झाला आहे. सदर मसुदा कायदा विभागाकडून तपासून घेण्यात आला आहे.<br>सबब, Quick Heal Foundation (QHF), पुणे व पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी सामंजस्य करारनाम्याची बाब विचारार्थ. | संगणकशास्त्र संकुल |
| **ठराव:** | **Quick Heal Foundation (QHF), पुणे व पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी सामंजस्य करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ६(१) ] | दि.०९/०६/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.०९/०६/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: दि.०९/०६/२०२५ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statuets No. S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीची व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार दि.०९/०६/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने ठराव क्र.२ अन्वये शिफारस केलेला दि.०९/०६/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकचा कार्यवृत्तांत विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | दि.०९/०६/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेल्या दि.०९/०६/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद